आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
७ फेब्रुवारी २०२५ शुक्रवार

**ठळक बातम्या**

- रिझर्व्ह बँकेकडून सर्वसामान्य कर्जदारांना दिलासा, रेपो दर पाव टक्क्यांनी कमी करुन सव्वा ६ टक्क्यांवर

- लोकसभेत आगामी आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पावर चर्चा सुरू

- राज्यातल्या विधानसभा निवडणुकी दरम्यान वाढलेल्या मतदार संख्येची चौकशी करण्याची महाविकास आघाडीची निवडणूक आयोगाकडे मागणी

**आणि**

- अंमली पदार्थ प्रतिबंधक विभागाकडून नवी मुंबईत २०० कोटी रुपयांचे अंमली पदार्थ जप्त, चौघांना अटक

<><><><><>

सर्वसामान्य कर्जदारांना दिलासा देत भारतीय रिझर्व्ह बँकेनं आज रेपो दरात पाव टक्के कपात केली. रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण आढावा समितीच्या बैठकीत एकमतानं हा निर्णय झाला. त्यामुळं रेपो दर साडे ६ टक्क्यावरुन सव्वा ६ टक्के झाल्याची माहिती गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी दिली. या समितीच्या निर्णयांविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून...

**होल्ड**

*रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण आढावा समितीची बैठक बुधवारपासून मुंबईत सुरू झाली होती. या बैठकीत झालेल्या निर्णयांची घोषणा करताना गव्हर्नर संजय मल्होत्रा म्हणाले की, समितीनं एकमतानं रेपोदर कपातीचा निर्णय घेतला आहे. यापूर्वी कोरोना काळात मे २०२० मध्ये बँकेनं व्याजदर पाव टक्क्यानं कमी केले होते. दोन वर्षांपूर्वी फेब्रुवारी पाव टक्क्यानं दरवाढ केल्यानंतर या दरांमध्ये अजिबात बदल झालेला नव्हता.*

*जागतिक पातळीवरच्या अस्थिर परिस्थितीचं कारण देत रिझर्व्ह बँकेनं आज आर्थिक वृद्धीदरांच्या अंदाजातही कपात केली. चालू आर्थिक वर्षात देशाचा आर्थिक वृद्धी दर ६ पूर्णांक ४ दशांश टक्के राहण्याची शक्यता आहे. पतधोरण आढावा समितीच्या गेल्या बैठकीनंतर हा दर ६ पूर्णांक ६ टक्के राहील, अशी शक्यता वर्तवली होती. आगामी आर्थिक वर्षाचा आर्थिक वृद्धीदराचा अंदाजही ६ पूर्णांक ९ दशांश टक्क्यांवरुन ६ पूर्णांक ७ दशांश टक्के, इतका कमी करण्यात आला आहे. चलनवाढीच्या दराच्या अंदाजातही*

*रिझर्व्ह बँकेनं कपात केली आहे. चालू आर्थिक वर्षात ग्राहक किंमत निर्देशांकावर आधारित महागाई दर ४ पूर्णांक ८ दशांश टक्के आणि पुढच्या आर्थिक वर्षात ४ पूर्णांक २ टक्के राहिल, असं रिझर्व्ह बँकेच मत आहे.*

*बँकांमधले घोटाळे कमी करण्यासाठी बँकांच्या वेबसाइटच्या नावात bank.in लावण्याचा निर्णय रिझर्व्ह बँकेनं घेतला आहे. एप्रिलपासून याची सुरुवात होईल. त्यानंतर वित्तीय क्षेत्रातल्या इतर संस्थांच्या वेबसाइटच्या नावात 'fin.in' असा वापर केला जाईल. २४ फेब्रुवारीपासून सुरू होणाऱ्या यंदाच्या वित्तीय साक्षरता आठवड्याचा भर आर्थिक निर्णय घेण्यासाठी आणि घरखर्चातली महिलांची भूमिका सक्षम करण्यासाठी असेल, असंही रिझर्व्ह बँकेनं जाहीर केलंय.*

*आकाशवाणी बातम्यांसाठी मुंबईहून अंकिता आपटे .*

**<><><><><>**

आगामी आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पावर आज लोकसभेत चर्चा झाली. चर्चेला सुरुवात करताना, केंद्रीय अर्थसंकल्प देशासमोरच्या कृषी आव्हानांना तोंड देण्यात अपयशी ठरला आहे, अशी टीका काँग्रेसचे धर्मवीर गांधी यांनी केली. शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा मुद्दाही त्यांनी उपस्थित केला. देशात शेतकऱ्यांच्या उत्पादनाला योग्य भाव मिळत नसल्याचा आरोप समाजवादी पक्षाचे नेते शिवपाल सिंह यांनी केला. एलपीजी सिलिंडरच्या किमतीत वाढ झाल्याचा मुद्दा तृणमूलच्या अभिषेक बॅनर्जी यांनी उपस्थित केला. केंद्रीय अर्थसंकल्पात पश्चिम बंगालला पुरेश तरतूद मिळालेली नाही, असाही आरोप बॅनर्जी यांनी केला. तर भाजपाचे राव राजेंद्र सिंह यांनी केंद्रीय अर्थसंकल्प हा गरीब, शेतकरी आणि महिलांचं हित जपणार असल्याचं म्हणत त्याचं कौतुक केलं. तसंच, केंद्र सरकारच्या विविध क्षेत्रातल्या कामगिरीवरून आणि देशाची अर्थव्यवस्था मजबूत करण्यासाठी उचललेल्या पावलांचीही सिंह यांनी यावेळी प्रशंसा केली.

**<><><><><>**

येत्या ५ वर्षांत गडचिरोली हे देशाचं पोलाद उत्पादन केंद्र म्हणून उदयाला येईल, असा विश्वास केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केला आहे. ते आज नागपूरमध्ये 'ॲडव्हांटेज विदर्भ २०२५' या तीन दिवसीय औद्योगिक प्रदर्शनाच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. 'लॉयड्स मेटल' सारख्या उद्योग समूहांनी गडचिरोली मध्ये उद्योग उभारल्यामुळे इथला नक्षलवादाचा प्रश्न बऱ्याच प्रमाणात

सुटला असून, युवा वर्ग रोजगाराच्या माध्यमातून समाजाच्या मुख्य प्रवाहात येत आहे, असं ते यावेळी म्हणाले. दावोस दौऱ्याच्या माध्यमातून विदर्भासाठी ५ लाख कोटी रुपयांचे  सामंजस्य करार करण्यात आले आहेत. पोलाद, इलेक्ट्रॉनिक वाहनं, सोलर बॅटरी , नवीकरणीय ऊर्जा अशा विविध क्षेत्रातले उद्योग स्थापन झाल्यामुळे विदर्भाचा विकास झपाटानं होत असल्याचं  मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितलं.

<><><><><>

राज्यातल्या विधानसभा निवडणुकीत मतदारसंख्या वाढल्याप्रकरणाची चौकशी करावी, अशी मागणी महाविकास आघाडीनं निवडणूक आयोगाकडे केली आहे. लोकसभेतले विरोधी पक्ष नेते राहुल गांधी, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी आज नवी दिल्लीत संयुक्त पत्रकार परिषदेत ही मागणी केली. निवडणूक आयोगानं दाद दिली नाही, तर आपल्याला न्यायालयाकडे जावं लागेल असं राहुल गांधी यांनी सांगितलं. राज्यात प्रौढ लोकसंख्येपेक्षा जास्त मतदार होते, असा आरोप राहुल गांधी यांनी केला. सरकारी आकडेवारीनुसार राज्यात प्रौढ लोकसंख्या ९ कोटी ५४ लाख आहे, तर मतदारसंख्या ९ कोटी ७० लाख आहे, असा दावा त्यांनी केला. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांदरम्यान मतदारसंख्या ३९ लाखांनी कशी वाढली असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. या प्रश्नांची उत्तरं निवडणूक आयोगानं दिली पाहिजेत असं संजय राऊत म्हणाले. निवडणूक पारदर्शी पद्धतीनं घेण्याची जबाबदारी निवडणूक आयोगाची आहे, असं सुप्रिया सुळे म्हणाल्या.

काँग्रेसला दिल्ली निवडणुकीत पराभव स्वीकारावा लागणार असल्यानं राहुल गांधी विनाकारण असे प्रश्न उपस्थित करत आहेत, अशी प्रतिक्रीया मुख्यमंत्री देवेंद्र

फडणवीस यांनी दिली. राहुल गांधी यांनी पराभवाबद्दल आत्मचिंतन करावं, असं ते म्हणाले.

विधानसभा निवडणुकीसंदर्भात काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी विचारलेल्या सर्व प्रश्नांची तपशीलवार लेखी उत्तरं दिली जातील, असं निवडणूक आयोगानं म्हटलं आहे. लोकशाहीत राजकीय पक्ष हा महत्त्वाचा घटक असून त्यांच्या प्रश्नांना उत्तरं देणं तसंच त्यांची मतं आणि सूचना ऐकून घेतल्या पाहिजेत असं आयोगानं म्हटलं आहे.

**<><><><>**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे सर्व ११ खासदार उद्धव ठाकरे यांच्यासोबतच आहेत, कोणीही पक्ष सोडणार नाही असं खासदार अरविंद सावंत यांनी स्पष्ट केलं आहे. ते आज नवी दिल्ली इथं पत्रकारपरिषदेत बोलत होते. केंद्र आणि राज्यातलं अपयश चर्चेत येऊ नये म्हणून जाणून बुजून अशा अफवांची राळ उडवली जात असल्याचा आरोप त्यांनी केला. सावंत यांच्यासह संजय देशमुख, नागेश आष्टीकर पाटील, संजय जाधव, राजाभाऊ वाजे, अनिल देसाई, भाऊसाहेब वाक्चौरे आणि पवन राजे निंबाळकर हे खासदार यावेळी उपस्थित होते. संजय राऊत, संजय दिना पाटील आणि प्रियंका चतुर्वेदी हे सर्व खासदार उद्धव ठाकरे यांच्याबरोबरच असल्याचं सावंत यांनी स्पष्ट केलं.

दरम्यान, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अनेक नेते आपल्या संपर्कात असून टप्प्याटप्प्यानं ते शिवसेनेत येतील असं मंत्री उदय सामंत यांनी सांगितलं. ते आज मुंबईत वार्ताहरांशी बोलत होते.

**<><><><>**

NCB, अर्थात अमली पदार्थ विरोधी पथकानं गेल्या आठवड्यात नवी मुंबईत केलेल्या कारवाईत अंदाजे २०० कोटी रुपये किमतीचे विविध प्रतिबंधित पदार्थ

जप्त केले. या कारवाईत NCB नं ४ जणांना अटक केली आहे. अंमली पदार्थांची तस्करी करणाऱ्या अमेरिकेतल्या एका टोळीनं मालवाहू सेवा, आणि मानवी तस्करांच्या माध्यमातून हे पदार्थ भारतात पाठवल्याचं NCB च्या अधिकाऱ्यांनी सांगितलं.

<><><><><>

अजिंठा नागरी सहकारी बँकेच्या ठेवीदारांच्या गैरव्यवहारप्रकरणी काँग्रेसचे माजी विधान परिषद सदस्य आणि बँकेचे अध्यक्ष सुभाष झांबड यांना आज पोलिसांनी छत्रपती संभाजीनगरात त्यांच्या घरातून अटक केली. ९७ कोटी ४१ लाख रुपयांच्या या घोटाळा प्रकरणात त्यांच्यावर वर्षभरापूर्वी गुन्हा दाखल झाला होता. तेव्हापासून झांबड फरार होते. या प्रकरणी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीप कुलकर्णी यांच्यावरही गुन्हा दाखल झाला होता.

<><><><><>

वाढत्या रस्ते अपघातांना आळा घालण्यासाठी नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत काल धडक कारवाई झाली. या कारवाईत वाहतुकीच्या नियमांचं उल्लंघन करणाऱ्या १ हजार ४४४ वाहनचालकांविरोधात कारवाई करण्यात आली.

//<><><><><>//